# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २०.५.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

शनिवार दि. २० मे २००६ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तनवाणी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ४.०० वाजता वंदेमांतरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त, नगर सचिव व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१४. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१५. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१६. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१९. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२२. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२३. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२४. स.स.श्री.काशीनाथ हरीभाऊ कोकाटे
२५. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२६. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२७. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२८. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
२९. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३०. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३१. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३२. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३३. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव

३४. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३५. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३६. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३७. स.स.श्री.खान निसार मो.खान
३८. स.स.शेख इब्राहीम शेख इमाम
३९. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४०. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
४१. स.स.सौ.राऊत छाया विलास
४२. स.स.श्री.बैनाडे कवरसिंग किसनसिंग
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४४. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४५. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४६. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४७. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४८. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४९. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५०. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
५१. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५२. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५३. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५४. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५५. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५६. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५७. स.स.श्री.खुडे विजय किसन
५८. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
५९. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६०. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६१. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६२. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६३. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६४. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६५. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६६. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६७. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६८. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६९. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७०. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७२. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७३. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७४. स.स.श्री.बारवाल गजानन
७५. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
७६. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
७७. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल

०२. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

०३. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**संवाद :**

श्री. डॉ.भागवत कराड : माजी केंद्रीय मंत्री व भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस मराठवाडयाचे भूमिपुत्र स्व.प्रमोदजी महाजन यांचे ३ तारखेला दु:खद निधन झाले ते त्यांचे नेतृत्व चांगल्याप्रकारे करील म्हणून त्यांना महानगरपालिकेतर्फे श्रध्दाजंली अर्पण करावी व त्यांचे एक स्मारक उभारण्यात यावे.

श्री पाथ्रीकर दत्ताभाऊ : यास माझे अनुमोदन आहे. त्याच प्रमाणे स्व.बाबुराव औराळकर यांचे दु:खद निधन झाले त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी. तसेच कांचनवाडी गॅस स्फोटातील ज्याचा मृत्यू झाला त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

सौ घोडेले अनिता : कांचनवाडी गॅस स्फोटातील जे १३ लोक मृत्यूमुखी झाले त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

मा.महापौर : श्रध्दांजली अपर्ण करणेसाठी सर्वांनी उभे रहावे.त्याच वेळी सभागृहातर्फे स्व.प्रमोदजी महाजन व स्व.बाबुराव औराळकर तसेच कांचनवाडी येथील १३ लोक गॅस स्फोटात मृत्यू झाले त्यांना २ मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अपर्ण करण्यात आली.

श्री.संजय जगताप : मा.विरोधी पक्ष नेता निवडी बाबत यापूर्वी आम्ही जे पत्र आपल्याला दिले त्या संदर्भात खूलासा करावा. अशी विनंती करण्यांत येते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : खूलासा देण्यात यावा.

मा.महापौर : आपण जे म्हणता, मला श्री.तरविदरसिंग धिल्लन यांनी पत्र दिलेले आहे. ते माझ्या दालनात दिलेले आहे, तुम्हाला काय खूलासा पाहीजे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : दोन विरोधी पक्ष नेता आहेत का, ४ आहेत. श्री.धिल्लन यांनी विरोधी पक्ष नेता पदाचा राजीनामा आपल्याकडे दिला का?

मा.महापौर : श्री.तरविंदरसिंग धिल्लन हे विरोधी पक्ष नेता होते त्यांना राजीनामा देण्याची गरज नाही ॲक्ट मध्ये तशी कुठलीही प्रोव्हीजन नाही. आपल्यापैकी जेव्हढे सदस्य माझ्याकडे आले होते. त्यापैकी मी विरोधी पक्ष नेते पदी नियुक्ती केलेली आहे. श्री.तरविंदरसिंग धिल्लन यांना एक पत्र देवून कळविले आहे की,विरोधी पक्ष नेता म्हणून आपण आता नाही .

श्री.तरविंदरसिंग धिल्लन : पत्र मला मिळाले नाही. ते देण्यात यावे.

मा.महापौर : ठिक आहे. पत्र मिळेल आपल्याला. महापौर दालनातून जावक क्र. ४७४, दिनांक ८.५.२००६ पाठवलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : हे पत्र कोणाला देण्यात आले.

मा.महापौर : माझ्या दालनातून ८.५.२००६ ला आऊटवर्ड झालेले आहे. आपल्याकडे आले नसेल तर त्याची प्रत आता ताबडतोब त्यांना द्यायला सांगतो.

श्री पाथ्रीकर दत्ताभाऊ : आपल्या वर्ष भराच्या कार्यकाळात येथे युतीची सत्ता असलेल्या ही शासनाने जे २५ कोटी ६ कोटी अनुदान महानगरपालिकेस दिले आहे त्याबद्दल मा.मुख्यमंत्री व शासनाचा या सभागृहाने अभिनंदनाचा ठराव पास करावा.

श्री संजय जोशी : या ठरावास आमचा विरोध आहे.

श्री भगवान घडामोडे : अनुदान देणे शासनाचे कर्तव्य आहे.

सौ.लता दलाल : अनुदान दिले म्हणून शासनाचा अभिनंदनाचा ठराव ठेवता.परंतू शासनाने या शहरासाठी संमातर जलवाहिनी टाकण्यासाठी जर अनुदान दिले तर खरोखरच

अभिनंदन केले जाईल.परंतू २५ कोटी जे दिले ते सिडको हस्तांतरण करायचे म्हणून दिले. जनतेसाठी दिले त्यांचे कर्तव्य बजावले. अभिनंदन करण्याची गरज नाही. समांतर जलवाहिनीसाठी अनुदान दयावे आम्ही आपल्या पाठीशी आहोत.

श्री पाथ्रीकर दत्ताभाऊ : यापूर्वी जेव्हा जेव्हा अनुदान दिले त्यावेळी शासनाचे अभिनंदन केले. समांतर जलवाहिनीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला तर सर्वांच्या सहकार्याने त्यासाठी ही अनुदान मिळविता येईल.अभिनंदन करणे म्हणजे राजकरण नाही. गैरसमज करून घेऊ नये. जे मिळते त्यात समाधान मानले पाहिजे. त्यासाठी मोठे मन ठेवावे अशी विनंती आहे.

श्री.कैलास गायकवाड : यापूर्वी आरक्षण उठवण्याचा ठराव झालेला आहे. तो रद्य करण्यात यावा.

श्री कोकाटे काशिनाथ : ३१ मार्च रोजी सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले त्यावेळी सिडकोच्या प्रत्येक भागात १ एप्रिल रोजी १० लक्षची कामे करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या वतीने होता. १ एप्रिल रोजी कामांना सुरूवात होणार होती. परंतू दुर्दैवाने सांगावे लागते की, जे जनतेला आश्वासन दिले त्यापासून प्रशासन दूर जाते असे माझे स्वत:चे मत आहे. १० लक्षची कामे होणे तर दूरच राहिले परंतू सिडकोकडून जी ५०% इमारत महानगरपालिकेच्या ताब्यात घेतलेली आहे. तेथील उद्घाटन आपल्या हस्ते झाले. सिडको-हडको भागातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी तेथे अधिकारी/कर्मचारी कार्यरत करणार होते. आज रोजी एक महिना २० दिवस झाले अद्याप महानगरपालिकेचे कार्यालय तेथे स्थलांतर झालेले नाही. सक्षम अधिकारी कुणी त्या ठिकाणी बसत नाही. सर्व दैनिकात त्यासंदर्भात बातम्या येत आहे. जनतेकडे दुर्लक्ष का केले जात आहे. या बाबतीत खुलासा करावा. जे डी.पी.रोड आहे. त्या ठिकाणी अतिक्रमण होत असूनप्रशासकिय विभागाचे संपूर्णत: दुर्लक्ष आहे ते का काढण्यात येत नाही. गुंठेवारीच्या नांवाखाली कुठलेही काम केले जात नाही. इतर विकास कामे नकरता १२०० पैकी ६०० कर्मचा-यांच्या बदल्या केल्या जे अधिकारी दोन महिण्यापूर्वीच मुख्य कार्यालयातून गेले त्यांचेच पुन्हा बदल्या केल्या. २-३ महिण्यात बदल्या होतात कशा? या संपूर्ण बाबीचा खुलासा करावा.

श्री संजय जगताप : ही प्रशासकिय बाब आहे. यात हस्तक्षेप होऊ नये.

श्री बन्सीधर गांगवे : मुकूंदवाडी भागात डी.पी. रोडवर भाजी बाजार भरतो.मा.सभापती यांनी तेथील पाहणी केली. रस्त्यावर हातगाडया उभ्या असतात. पायी जाणारे लोकांना रस्ता नाही. भाजी मंडईसाठी पर्यायी जागा देणे ही सिडको प्रशासनाची जबाबदारी आहे.त्यांनी आश्वासन दिले आहे. त्वरीत हा रस्ता सेक्युरिटी गार्ड पाठवून मोकळा करून दयावा. रात्री ८ ते ९ वाजेपर्यन्त तेथे खाजगी सुरक्षा रक्षक ठेवून अतिक्रमण होणार नाही याची दखल घ्यावी.

श्री संतोष खेडके : पुंडलिकनगर मेनरोड आहे. पुढे गजानन महाराज मंदिर रस्त्यालगत मोठया प्रमाणात लोकांचे अतिक्रमण झालेले आहे. एकतर भाविकांची गर्दी पत्र देवूनही अतिक्रमण काढण्यात आले नाही. त्याबाबतीत कार्यवाही व्हावी.

श्री बाबासाहेब डांगे : आताच श्री गांगवे मामा यांनी भाजी मंडईच्या संदर्भात जो मुद्या मांडला त्यासंबंधी संबंधीत वॉर्डचे नगरसेवक श्री दामु अण्णा शिंदे यांनी अनेक वेळा पत्र दिली. परंतू कार्यवाही झाली नाही. मा.आयुक्त यांनी स्वत: पाहणी केली. मी सुट्टीवर जात आहे. आल्यावर दोन दिवसात याबाबतीत निर्णय घेतला जाईल असे आश्वासन दिले होते. परंतू अद्याप कार्यवाही झाली नाही. आजच याबाबत निर्णय घ्यावा नसता सभा होऊ देणार नाही.

श्री संजय जोशी : अतिक्रमण विभागात एकच वाहन असून जेव्हा केव्हा मागणी केल्यास वाहन नाही म्हणून उत्तर दिले जाते. शहरात रंगारगल्ली व अन्य इतर भागात मोठया प्रमाणात

रस्त्यावर अतिक्रमण दिसून येते. दुपारी आणलेले सामान २५ किंवा ५०/- रू.दंड करून सायंकाळी सोडून दिले जाते. पुन्हा तेच सामान सदर व्यक्ती घेवून रस्त्यावर अतिक्रमण करतो. जे सामान घेऊन येतात ते परत देण्यात येऊ नये. जेणेकरून लोक रस्त्यावर अतिक्रमण करणार नाही.

श्री अ.रशिद खॉंन : कुणी जर म्हटले अधिकारी काम करीत नाही. त्यावर मा.आयुक्त ॲक्शन घेतात.बदल्या करतात. बदल्या का केल्या जातात असे म्हटले तर ही प्रशासकीय बाब आहे. इनंटरनल बदली होत असते तर त्यात हरकत नसावी.

श्री संजय जोशी : सिडको हस्तांतर केल्यानंतर प्रत्येक वॉर्डात १०-१० लक्षची कामे होणार होती. अद्याप एकही कामास सुरूवात झाली नाही याचा खुलासा करावा.

श्री महेश माळवतकर : सिडको हस्तांतर होऊन एक ते दीड महिण्याचा कालावधी झाला.सिडको कार्यालयाच्या ठिकाणी एखादया ढाप्याची मागणी केली असता मंजूरी नाही. तरतूद नाही म्हणून सांगण्यात येते. सिडकोच्या एका विशिष्ट भागात नाला सफाईचे काम चालू आहे. मागील जुलै महिण्यात मोठया प्रमाणात पाऊस झाला व सिडको भागात नाल्यास मोठया प्रमाणात पाणी आले होते. ८ ठिकाणी नाला फुटला व तातडीने बांधण्याची गरज आहे. यासंबंधीची संचिका लेखा विभागात गेली असता खर्च करायचा कोठून म्हणून ती संचिका थांबून आहे. आता बजेट मंजूर होणार नंतर टेंडर होईल व पावसाळा सुरू झाल्यानंतर नाला साफ होणार का? ज्या सिडको भागातील नाला सफाईचे काम होत आहे ते कोणत्या लेखा शिर्षकातून होत आहे. जेथे नाला सफाईचे काम होत आहे.पुढचा भागच साफ नाही तर मागचा भाग साफ सफाई करून उपयोग काय ? हे विशिष्ट काम कुणाला दिले कुणाच्या अधिकारात दिले जेथे ते काम संपले तेथ पासून माझा वार्ड सुरू होतो. तेथील सफाई झाली नाही तर मागील सफाई करून उपयोग काय.उद्‌देश सफल करायचा असेल तर सिडको हडकोतील सर्वच नाले एका वेळी साफ सफाई करावे. पावसाळयापूर्वी म्हणजेच सिडकोप्रमाणे मे महिण्यातच नाले साफ करावे. एन –९ भागात नाल्याचे काम चालू आहे. टेंडर काढले नसतांना तो नाला साफ कसा होतो. सर्वच नाले साफ करावे. सिडको कार्यालयात कर्मचारी कार्यरत आहे परंतू त्यांना ढापा देण्याचे सुध्दा अधिकार नाही.

श्री बन्सीधर गांगवे : माझा वॉर्ड आकाराने मोठा असून कर्मचारी सफाईसाठी कमी दिलेले आहे. एन-३ एन-४ भागात नाले नसताना तेथे ४०-४० कर्मचारी सफाईसाठी आहे व आमचा वॉर्ड मोठा असून २८-२९ कर्मचारी दिले तसेच सिडको भागात जे विकास कामे होणार आहे ती कामे वार्ड कार्यालयाकडून की,मुख्य कार्यालयाकडून होणार आहे.लहान लहान ड्रेनेज लाईनचे पाणी रस्त्यावर वाहते अधिका-यांना कळविले तर मुख्य कार्यालयाकडून तसे आदेश नाही. आदेश प्राप्त झाल्यावर काम केले जाईल असे सांगितले जाते ही कामे प्रभाग कार्यालय की मुख्य कार्यालयाकडून होतील याचा खुलासा करावा.

श्री कवरसिंग बैनाडे : सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतर ही चांगली बाब वाटत होती. विकास कामे होतील अशी अपेक्षा होती.परंतू जवळपास २ महिने होत आहे.विकास कामाकडे दुर्लक्ष होते. बजरंग चौकात एका व्यक्तीने भिंतीवर अतिक्रमण केले.सिडको महानगरपालिकेत हस्तांतरण झाले म्हणून माझ्या कार्यालयास लागून असलेल्या अनाधिकृतरित्या टावर उभे केले. महानगरपालिकेचे अधिकारी यांनी पाहणी केली नोटीस देण्यात येईल म्हणून सांगितले.परंतू अद्याप कार्यवाही केली नाही. मी स्वत: ५ पत्र दिले तरी कार्यवाही केली नाही. कर्मचारी तेथे येतात.संबंधिताकडून चहापान घेतात निघून येतात असे असेल तर नगरसेवकांनी तक्रार कुणाकडे करायची. यापूर्वी सिडकोकडे तक्रार केल्यानंतर ताबडतोब गाडी

अतिक्रमण काढण्यास येत असे. ५-६ दिवसापासून माझ्या वार्डातील कॉलनीतील लाईट बंद आहे. सदर कॉलनी मोठी असून वयोवृध्द लोक राहतात. सिडको भागातील होत असलेले अतिक्रमण काढण्यासंदर्भात वॉर्ड अधिकारी असतात त्यांना अधिकार दयावेत.

डॉ.भागवत कराड : सिडकोने महानगरपालिकेकडे हस्तांतरण केले. परंतू हस्तांतरण केल्यानंतर महानगरपालिकेकडून लहान लहान कामे होत नाही. हस्तांतरण होवून दोन महिने होत आहे. प्रशासनाने याकडे विशेष लक्ष दिले नाही. ज्या काही सुविधा देण्याची गरज आहे. त्या देण्यात याव्यात . सुधारण्याचा प्रयत्न करावा.

श्री दामु अण्णा शिंदे : सिडकोसाठी वेगळे पथक नियुक्त करावे. अतिक्रमण असेल ते काढावे प्रत्येक भागात अतिक्रमण होत आहे.तसेच भाजीमंडईसाठी पर्यायी जागा देणार होते.मुकूंदवाडी रस्त्यावरील अतिक्रमण हटवावे. मा.आयुक्त यांनी तेथे पाहणी केलेली आहे परंतू नुसते आश्वासन दिले कार्यवाही झाली नाही.

मा.महापौर : सिडको संदर्भात स.सदस्यांनी प्रश्न विचारले त्याबाबतीत मा.आयुक्त यांनी सविस्तर खुलासा करावा.

मा.आयुक्त : सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण केल्यानंतर तेथे काम करावे लागते. म्हणून शासनाकडून १५कोटी रक्कम मिळालेली आहे महानगरपालिकेकडे १५ कोटी येणार याबाबतीत जी चर्चा झाली होती.करारनामा झाला. १ एप्रिल पासून हस्तांतर करणार असे निश्चित केले होते. ज्या वेळेस हस्तांतरण होईल. त्या दिवसांच्या १०-१२ दिवसांच्या आत प्रत्येक वार्डात १०-१० लक्षचे काम सुरू व्हावयास पाहिजे असे प्रशासनाचे मत होते म्हणून जे सिडकोचे नगरसेवक आहेत त्यांना कळविले होते की, आपण आपल्या वॉर्डातील १० लक्ष पर्यन्तचे कामे सुचवावे. ५-६ एप्रिल पर्यन्त ही कामे १५ कोटीमधून सुरू करू असे ठरले होते. ३ मार्चपासून ते ३० मार्चपर्यन्त २६-२७ दिवसात चांगले काम कर्मचा-यांनी/ अधिका-यांनी केले. त्यात सर्व कामाचे १० लक्षचे अंदाजपत्रक तयार करून २४ तारखेला टेंडर प्रोसेससाठी मान्यता घेण्यासाठी माझ्याकडे आले होते. बजेट ठेवताना १५ कोटी हा सिडको भागासाठी विविध विकास कामे म्हणून लेखा शिर्षक होते. जेव्हा १५ कोटीचे बजेट स्थायी समितीकडून सर्वसाधारण सभेसमोर आले तेव्हा कामनिहाय विभागणी झाली व जे १०-१० लक्षची कामे होती ती त्यात समावेश नव्हती. त्यामुळे टेंडर काढू शकलो नाही. सर्वसाधारण सभेस बजेट मंजूर झाले. बजेट बुक छपाई होत आहे. कार्यवाहीसाठी प्रशासनाकडे आलेले नाही. १०-१० लक्षचे जी जी कामे सुचविली होती त्यातील १०-११ कामेही बजेट बुक मध्ये येण्याची शक्यता आहे.

मा.महापौर : स्थायी समितीच्या बजेटमध्ये जी कामे होती.त्यात कुठले ही काम कमी न करता उलट जास्तीच्या कामाचा समावेश केलेला आहे. प्रशासनाला अशी सूचना की बजेट बुक होण्यास अजूनही ८-१० दिवस लागतील जे स्थायी समितीच्या बजेटमधील कामे आहे त्यातील कामे असतील तर अंदाजपत्रक करण्यास हरकत नाही.

मा.आयुक्त : सर्व नगर सेवकांचे १० लक्षची कामाचे अंदाजपत्रक २४ तारखेला माझ्याकडे आलेले होते. त्यापैकी जे कामे होणार आहे. १५कोटीचे विभाजन करताना स्थायी समितीने जे काही कामे सुचविली आहे त्यांचे टेंडर काढलेले आहे. नगरसेवकांचा काही तरी गैरसमज झाला. १५ कोटी व्यतिरीक्त ही कामे होतात असे सदस्यांना वाटले. परंतू जी १०-१० लक्षची यादी नगरसेवकांनी दिली. त्या कामाचे नांव बजेटमध्ये आले नाही म्हणून करणे अशक्य आहे. परंतू त्यात जे १०-१२ कामे स्थायी समितीच्या बजेटमध्ये होती. ती कामे सर्वसाधारण सभेच्या बजेटच्या

मंजूरीची वाट न बघता त्या कामाचे टेंडर काढलेले आहे. दुसरे असे की, सिडको कार्यालयात महानगरपालिकेचे कार्यालय सुरू केले.चांगल्या प्रकारचे कार्यालय व्हावी अशी अपेक्षा ठेवली.चांगली इमारत व्हावी म्हणून वास्तु विशारद नियुक्त केले त्यासाठी स्थायी समितीची मान्यता घेतली त्या कामाचे अंदाजपत्रक काढले. २८.०० लक्षाचे आहे ते ऐनवेळी ठेवत आहे. १० लक्ष तरतूद ठेवलेली आहे. आजच्या बैठकीस मान्यता मिळाल्यानंतर २-४ दिवसात टेंडर काढले जाईल. तिसरा प्रश्न असा की नाला सफाई नाल्याचे बांधकाम करावे लागणार आहे. कॅपीटल वर्कमध्ये येते. नाल्याचे बांधकाम करण्यासाठी कोणत्या हेड मधून खर्च करावे. सर्वसाधारण सभेने निर्णय घ्यावा. नाला सफाईचे कामचालू आहे. मागील बाजूस चालू केले पुढे नाही त्याचा फायदा होईल का? यासंदर्भात संबंधीत अधिकारी खुलासा देतील. सिडको हस्तांतरण करण्यास २८ दिवस मिळाले. हस्तांतरण करणे म्हणजे एक नगरपालिकेचे कामकाज करणे. २८ दिवस कर्मचाऱ्यांनी खरोखरच रात्री १२ वाजेपर्यन्त काम केले,सर्व कामाचे टेंडर काढले. काही ठिकाणी कमी सफाई कर्मचारी आहे.त्याप्रमाणे कार्यवाही करावी लागते. मा.सर्वोच्च न्यायालयाचा जो काही निकष सिडको असतांना १८०सफाई कामगार होते आणि महानगरपालिकेने २८४ सफाई कामगार असावे म्हणून टेंडर काढले. ज्या भागात जास्त कमी मजूर झाले असतील तर वार्ड अधिकारी यांनी याबाबत योग्य पडताळणी केली तर योग्य होईल. पुन्हा वाटप करावे व त्यास प्रभाग समितीने मंजूरी दयावी.मुकूंदवाडीच्या भाजी मंडई संदर्भात सिडको प्रशासक यांचेशी माझे बोलणे झाले. सोमवारी १२.०० वा.माझ्या निवासस्थानी बैठक ठेवली आहे त्यात असे की मा.हायकोर्टच्या निर्णयानंतर सिडको प्रशासनाचे काही लोकांना अटी शर्तीनुसार जागा दिली. कुणाला जागा दिली कुणाला दयायची त्याची यादी घेवून प्रशासन यांना बोलाविले आहे जी जागा दिली आहे तेथे कुणी बसत नाही.

मा.महापौर : रस्त्यावर लोक बसतात. अतिक्रमण काढले जाते पुन्हा तेथे लोक येवून बसतात याबाबतीत प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

मा.आयुक्त : अतिक्रमण १०० टक्के काढणार रस्त्यावर कुणासही बसू देणार नाही. मा.उच्च न्यायालयाचे सुध्दा डायरेक्शन आहेत. याबाबत सिडको प्रशासनाला माहिती आहे. रस्त्यावर कुणास बसू दिले जाणार नाही व नव्याने कुणास ही जागा दिली जाणार नाही.

श्री दामु अण्णा शिंदे : मटन मार्केटसाठी कुठे जागा देणार आहे.

मा.आयुक्त : कुठे कुठे बसण्यासाठी जागा दिली होती . हे जो पर्यन्त माहिती करून घेणार नाही तो पर्यन्त अंतिम निर्णय घेवू शकत नाही. प्रशासनाला एक आठवडयाचा वेळ दयावा. फायनल पॉलिसी निर्णय घेवून कार्यवाही केली जाईल. सिडको भागाच्या अतिक्रमणाच्या संदर्भात डायरेक्शन दिले जाईल. सर्व अतिक्रमण काढले जाईल. गजानन महाराज मंदिराजवळील रस्त्यावर जे अतिक्रमण होते त्या बाबतीत प्रशासकीय अधिकारी यांनी नोंद घ्यावी व कार्यवाही करावी.

श्री सतिश कटकटे :रविवार बाजारच्या ठिकाणी एक वर्षापूर्वी मा.आयुक्त यांनी पहाणी केली.अद्याप काहीच कार्यवाही केली नाही.

मा.आयुक्त : पाहणी केली तेव्हा कडबा मार्केटची अडचण दिसून आली.डायरेक्शन दिले आहे कार्यवाही होईल.

श्री बन्सीधर गांगवे : सिडकोने भाजी मंडईसाठी पर्यायी जागा देवू म्हणून आश्वासन दिले आहे.सिडको प्रशासकाकडे मागणी करून जागा देण्यास हरकत नाही.रस्तयावर अतिक्रमण होणार नाही.

श्री संजय जोशी : गजानन महाराज मंदिर समोर स.सदस्या यांचा दवाखाना असून रूग्णाना जाण्यास रस्ता नाही एवढी रस्त्यावर अतिक्रमणे आहेत.

श्री नारायण कुचे : गेल्या वर्षी पावसाने नाला वाहून गेला. दुरूस्तीसाठी १० लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते.परंतू काम केले नाही बजेटमध्ये नाही तर काम कोणत्या हेडमधून करणार आहे याचा खुलासा करावा.

मा.आयुक्त : १०-१० लक्षचे जे काम स.सदस्यांनी सुचवले होते ते फारच महत्वाचे होते.बजेटमध्ये आले नसतील आतास.सदस्यांनी सांगावे की १५ कोटीतील कोणती कामे कमी करायची व १०-१० लक्षचे कोणते काम त्यात घ्यायचे.

सौ. मेहरून्नीसा खॉंन : माझ्या वॉर्डात ड्रेनेजचे पाणी नाल्यालगतच्या लोकांच्या घरात आलेले आहे.तीन महिण्यापासून नाला सफाई होणार म्हणून चर्चा चालू आहे केव्हा नाले सफाई होणार आहे.नाल्यातून ड्रेनेजचे पाणी येते.

श्री अ.रशिद खॉंन : नाल्यातील ड्रेनेजचे घाण पाणी आजु बाजूच्या घरात येत आहे.नाला सफाई केव्हा होणार याचा खुलासा घेण्यात यावा.

श्री संजय जोशी : शहरात सुध्दा नाल्याची परिस्थिती बिकट आहे. नाल्यावर मोठमोठया इमारती असून त्या खालील नाला साफ सफाई झालेला नाही. पावसाळा सुरू होण्यापूर्वीच केव्हा नाले सफाईचे काम झालेले दिसून आले नाही. आज तीच परिस्थिती असून वृत्तपत्रात येते. मान्सुन पूर्व नाला सफाई प्रत्यक्षात काहीच नाही.शहरातील नाल्याची खोली कमी झालेली असून मोठया प्रमाणात घाण साचलेली दिसून येते. सावरकर चौक,रोपळेकर हॉस्पीटलजवळ नाला आहे.तेथे नालाच दिसून येत नाही. पूर्णपणे घाण साठलेली आहे. त्या नाल्याद्वारे येणारे पाणी झांबड इस्टेट,चेतनानगर व गुरूदत्त हौसिंग सोसायटीमध्ये जाईल हीच परिस्थिती पूर्ण शहरात आहे. मागील वर्षीसुध्दा देशपांडे नांवाचे रहिवासी त्यांचे घरात पाणी गेले होते.प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. येत्या आठ दिवसांच्याआत नाला साफ सफाई मोहीम सुरू करण्याच्या सूचना कराव्यात.

श्री कैलास गायकवाड : सिल्कमील कॉलनी आरक्षण उठवण्याचा प्रस्ताव रद्य करावा.

सौ.लता दलाल : नमूद करावेसे वाटते की,गेल्या वर्षी सर्वच नाल्याचा प्रशासनाने सर्व्हे केलेला होता. अनेक नाल्यावर अतिक्रमण असून महानगरपालिकेसमोर सुध्दा अतिक्रमण आहे. नाल्यास पावसाचे पाणी येईल.लोकांच्या घरात पाणी जाईल व नंतर प्रशासन कार्यवाही करेल असे वाटते. जो सर्व्हे केला होता नाल्याच्या बाजूला लोकांनी घरे केली भर आकण्यात आली ते अतिक्रमणे काढली का ? काही ठिकाणी नाला सफाई झाली असेल तर काही ठिकाणी नाल्याच्या बाजूला भर टाकून जागा तयार केल्या. नाला सफाई चालू आहे व त्याचे छायाचित्र वृत्तपत्रात येत असतील तर ही धुळफेक आहे. पूर्णपणे नाला साफ सफाई करावी अशी मागणी सर्वच स.सदस्यांची आहे. पावसाळयापूर्वी ही नाला साफ सफाई का केली नाही थातूर मातूर साफ सफाई करू नये पूर्णत: सफाई व्हावी . किती ठिकाणी जे.सी.बी.लावून नाल्याची कशा प्रकारे सफाई केली,किती ठिकाणचा गाळ काढलेला आहे.संपूर्ण माहिती या सभागृहास देण्यात यावी.

सौ.अजरा जबीन : मागील वर्षीच्या कामात लेखा शिर्षक बदल करून नालाच्या संरक्षित भिंत बांधण्यासाठी मंजूरी दिली होती. परंतू सदर कामाचे आतापर्यन्त टेंडर काढले नाही. पावसाळा १०-१२ दिवसात येणार आहे. संरक्षित भिंतीचे काम होणार की नाही याचा खुलासा घेण्यात यावा. यासंदर्भात कोणतीही माहिती नाही. प्रत्येक वर्षी चिखल होतो. कायमचा पर्याय काढावा.

श्री रविंद्र गांगे : नाला सफाईसाठी टेंडर झाले परंतू वर्क ऑर्डर केव्हा देणार आहे खुलासा करावा.

श्री. सलिमखॉन : नाल्या संदर्भात विषय निघाला औरंगपुरा भागात नाल्यावर मोठी इमारत होत आहे त्यास परवानगी कुणी दिली असे बांधकाम करता येते का ? सदर बांधकाम महानगरपालिकेचे आहे का ?

सौ.कला बोरमणीकर : टेंडर काढतांना मोठया प्रमाणात बिलो येते असे टेंडर मान्य करू नये ठेकेदार व्यवस्थित का करीत नाही पैसे कमी पडतात म्हणून नंतर काम अर्धवट ठेवतात.माझ्या वार्डातील एक काम ४ टक्के बिलोने घेतले म्हणून ते काम संबंधीत ठेकेदार सोडून गेले.

श्री संजय शिरसाठ : नाले सफाई व सिडको भागाच्या अतिक्रमण संदर्भात एक तासापासून चर्चा चालू आहे. कामाचे नियमन केले व सर्व कार्यक्रम राबविणार आहे असे प्रशासनाने नमूद केले खेदाने म्हणावे लागते. नुकतीच महानगरपालिका ड वर्गात गेली व यापुढे कोणत्याही पदास शासन मान्यता देणार नाही. सिडको हस्तांतरण म्हणजे एक लहान नगरपालिका महानगरपालिकेकडे आलेली आहे. त्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग कोठून देणार आहे याचा खुलासा प्रशासनाने केलेला नाही. १६५ पदांना मंजूरी दयावी म्हणून शासनाकडे पाठविण्यात आले. एकीकडे शासनाचे परिपत्रक येते की कोणत्याही पदाना मान्यता मिळणार नाही ज्या जास्तीच्या जागा आहेत ते भरता येणार नाही जसे शहर अभियंता आहे ते निवृत्त झाल्यानंतर पुन्हा ते पद त्या दर्जाचे राहणार नाही. कार्यकारी अभियंता पदाची ३ पदे होती आता दोन राहती ल. प्रशासन नागरीकांना आश्वासन देत आहे की, सिडको हस्तांतरण केले जाईल नागरीकांना सुविधा देवू परंतू ती कामे होणार नाही ही सत्य परिस्थिती आहे. नाला सफाईचे नियोजन नेमके करते कोण ? गेल्या स्थायी समितीस आरोग्य विभागामार्फत प्रस्ताव आला होता. प्रस्ताव आरोग्य विभाग ठेवते व खुलासा शहर अभियंता देणार ताळमेळ कळत नाही. अनेक कामे ६७(३) (१) मध्ये मा.आयुक्ताच्या अधिकारात केलेले आहे. सर्व वृत्तपत्रात छायाचित्र आले नाल्यात घाण साचलेली आहे. एम.पी. लॉ कॉलेजकडे नाल्यालगत कुठे तरी इमारत होत आहे. मनपाच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या बाजूला नाल्यालगत मोठया प्रमाणात घरे झालेली प्रशासन ती का काढत नाही. प्रशासनाला आव्हान आहे काढून दाखवावे.

श्री.संजय शिरसाट : मागील वर्षी नाल्याचे पाणी घरामध्ये गेले त्याचे कारण नाल्यावर अतिक्रमण करून घरे केलेली आहे. नाला सफाई होईल. परंतू नाल्यालगत असलेले अतिक्रमण हटविले पाहिजे अतिक्रमण विभागात फक्त ६ इमारत निरिक्षक १० लक्षच्या लोकसंख्येच्या शहरासाठी आहे त्यांचेकडे फक्त एक वाहन आहे. एकदा गाडीत ४ खुर्च्या जरी आणायच्या असेल तर पंचनामा वगैरे करून ४ तास लागतात. त्या गाडीत प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांचा खर्च ४-५ हजार व ५०/- रू.दंड आकारून ३-४ तास वाया घालवून वसूल केला जातो हे कितपत योग्य आहे. रंगारगल्ली ते गुलमंडी पैठणगेट रस्त्यावर सध्यांकाळच्या वेळेस मोठया प्रमाणात दुकान समोर रस्त्यावर गाडया उभ्या असतात व गाडीवाले दुकानदाराना प्रत्येक दिवसांचे १५० ते २०० रूपये देतात अशी परिस्थिती आहे हे सर्व स.सदस्यांनी बोलायचे असेल तर प्रशासकिय विभाग का कार्यवाही करीत नाही असे आदेशित करावे की जर एखादया नगरसेवकांने पत्र दिल्यानंतर तेथील अतिक्रमण तात्काळ काढले पाहिजे तर नगरसेवक यास पाठींबा देत असतील तर त्यांचेवर किंवा तसेच जे संबंधीत अधिकारी व इमारत निरिक्षक दोषी असतील त्यांचेवर पोलिसात गुन्हा नोंद करण्याची तरतूद आहे. अनेक ठिकाणी अतिक्रमण होत आहे.प्रशासकीय विभाग दोन करावे काम विभागून तीन तीन वार्ड कार्यालय करावे असे केल्यास जर त्या त्या भागात अतिक्रमण होत असेल तर त्या त्या संबंधीत अधिकारी/कर्मचारी

यांचेवर जबाबदारी फिक्स होईल. ६ इमारत निरिक्षकावर काम भागणार नाही. जास्तीचे लागतील. कर्मचारी भरती करता येत नसतील तरी इतर कर्मचा-यांना डेप्युटेशनवर घेता येईल.नाल्याच्या संदर्भात ज्या दुकानदारांच्या नाल्यावर जागा दिली त्यांना ताबडतोब नोटीस देवून नाला सफाई करण्याचे सूचना कराव्या.पावसाळा जवळ येत आहे नाले सफाई तात्काळ करावे तसे आदेशित करावे.

श्री पुरूषांत्तम ठाकूर : शहरात किती खुल्या जागा महानगरपालिकेच्या आहे. किती अतिक्रमणे आहेत किती लेआऊट महानगरपालिकेच्या नांवाने आहे. नगरसेवकांनी पत्र दिल्यानंतर तेथील अतिक्रण काढले जात नाही ते काढून तेथे महानगरपालिकेच्या नांवाचा बोर्ड लावण्यात यावे.

मा.महापौर : सभागृहाचे मत लक्षात घेता प्रशासनाने अतिक्रण विभाग सक्षम करावे व ज्या ज्या ठिकाणचे अतिक्रमण बाबत स.सदस्य यांनी सूचना केल्या त्या संदर्भात प्रशासनाने कार्यवाही करावी. नगरसेवकांनी पत्र दिल्यानंतर त्यांना उत्तर देण्यात यावे. नाले साफ सफाईच्या बाबतीत प्रशासनाने काय नियोजने केले याचा खुलासा संबंधित अधिकारी यांनी करावा.

श्री. अ.रशिद खान : १८४८ कर्मचारी साफसफाईसाठी आहे इतर कर्मचारी कुठे आहे.

श्री बन्सीधर गांगवे : सिडको टाऊन सेंटरकडून एम.आय.डीसी.कडे जाणारा जो रस्ता आहे त्या रस्त्यावर ३-४ फुट पाणी तुंबते. समोर नाला आहे त्या नाल्यातून पुढे पाणी जात नाही तो नाला बिल्डर लोकांनी इमारती करून बंद केलेला आहे.

श्री रविंद्र गांगे : इमारत निरिक्षक हे अनेक वर्षापासून त्याच विभागात काम करतात ते काम करण्यास सक्षम नाही असे माझे मत आहे.

मा.महापौर : अतिक्रमण संदर्भात रूलिंग दिले नाला सफाई संदर्भात खुलासा करावा.

कार्य.अभि.(वि/ड्रे) : दरवर्षी प्रमाणे शहरातील जे ठराविक नाले आहेत. या नाल्यात ५-६ फुट घाण व गाळ झालेला आहे. वर्षानुवर्षे नागरीक कचरा नाल्यामध्ये टाकतात. त्यामुळे नाल्याची लेव्हल कमी झाली उच्चाटन करावयाचे असेल तर ५-१० कोटी रूपये सफाईसाठी लागतील. आता जे नाला सफाई टेंडर आहे ते फक्त नाल्यात पाणी साचवून न राहता वाहून जाण्या इतपत घाण काढली जाणार आहे. शहरातील एहू.ण ३० नाले साफ सफाईचे अंदाजपत्रक केले असून त्यासाठी ३८.६८ लक्ष इतका खर्च येणार आहे व ही रक्कम तुटपुंजी स्वरूपाची असून तात्पुरती उपाय योजना म्हणून ही कार्यवाही करीत आहोत. सिडको भागात सुध्दा एकूण २४ ठिकाणचे नाला सफाईचे अंदाजपत्रक तयार केले आहे. प्रशासकीय मान्यता होवून निविदा काढलेल्या आहेत. २४ तारीख शेवटची असून लवकर कार्यवाही होवून १० जून पर्यन्त संपूर्ण नाले साफ सफाई करण्यात येतील. नाल्यात मोठया प्रमाणात कचरा वाळू तसेच घाण असून मोठया प्रमाणात संपूर्ण घाण काढायची असेल तर मोठया प्रमाणात खर्च येणार आहे.

श्री. संजय जोशी : दरवर्षी नाला साफ सफाई व्यवस्थीत होत नाही म्हणून घाणीचा थर आला असा अर्थ होतो याचा अर्थ व्यवस्थित सफाई होत नव्हती आता करतील. शहरातील लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते आणि नाल्यामध्ये सतत वाहते पाणी दिसून येते.पहिल्यांदा ड्रेनेज लाईनचे पाणी नाल्यात सोडलेले आहे ते बंद करावे.

कार्य.अभि.(वि/ड्रे) : अनेक ड्रेनेजचे पाणी नाल्यातून वाहते. या संदर्भात नुकताच सर्व्हे करण्यासाठी निविदा काढलेली आहे. ज्या मुख्य लाईन फुटलेल्या आहे त्यासाठी काय उपाय योजना करता येईल यासाठी प्रयत्न चालू आहे.

(याच वेळी उप महापौर हे पीठासीन अधिकारी म्हणून आसन ग्रहण करतात)

सौ.लता दलाल : ३८-६८ लक्षमध्ये नाला सफाई होत नाही म्हणून खुलासा केला हा पैसा व्यर्थ खर्च होतो. आताच स.सदस्य श्री अ.रशिद खॉंन यांनी म्हटले १८ मजूर लावण्यात येते,त्यापैकी ८ मजूर काम करतात. परंतू संपूर्ण खर्च होतो नाला सफाई होत नाही तर नाला सफाई कशासाठी करतो. एक वर्ष थांबवून जास्तीचे बजेट ठेवून पूर्णत: खालवर नाला सफाई करावे. केवळ वरचा कचरा काढला जातो. पूर्णत: सफाई होत नाही हे प्रशासनाच्या उत्तरातूनच आले. नाला सफाई होते की वर वरच कचरा काढला जातो.

श्री महेश माळवतकर : आताच खुलासा केला जी सफाई होत आहे ती तात्पुरती होत आहे. या सुधारणा करू इच्छितो की,वर वर काम करायचे असेल तर हा प्रश्न सुटणार नाही. खोल पर्यन्त नाला साफ करावे जेणेकरून नाल्याकाठची घरातील नागरीकांना त्रास होणार नाही याची दखल घ्यावी. जे नाले पडलेले आहे ते दुरूस्त झाले पाहिजे तरतूद ठेवली पाहिजे व काम केले पाहिजे. नागरीकांना त्रास झाला तर प्रशासनास काम करू देणार नाही यांचे सुध्दा गांभीर्य घ्यावे.

मा.उप महापौर (पीठासीन अधिकारी ) : नाल्यावर अतिक्रमण होणार नाही याची दखल प्रशासनाने घ्यावी.

श्री काशीनाथ कोकाटे : दोन लक्ष सिडकोची लोकसंख्या आहे. मा.आयुक्तानी खुलासा केला. ३ मार्च ते २४ मार्चपर्यन्त कर्मचारी/अधिकारी यांनी रात्रंदिवस मेहनत घेवून कामे केली. प्रशासनातील अधिकारीकिती तास काम करतात याची मला कल्पना आहे. इतर अनुभवी स.सदस्य सभागृहात आहे. मा.आयुक्त यांनी त्यांची बाजू चांगली मांडली बाजू घेण्यापुरते मी ही कौतूक करतो. परंतू प्रशासन प्रत्यक्ष काम करीत नाही. खुलासा चांगला दिला आकडेवारी देवून आकडेवारी दयायची त्यात समाधान झाले असा समज करून घेवू नये. बदल्या करणे ही प्रशासकीय बाब आहे परंतू एकच अधिकारी यांना दोन-दोन ठिकाणी कामे देणे हे संयुक्तीक वाटत नाही. प्रशासनास जाब विचारण्याचा आम्हांला नैतिक अधिकार आहे. प्रशासन प्रशासनाचे काम करील परंतू सभागृहाच्या भावना हया जाणुन घेतल्या पाहिजे. प्रशासन स्वत:च्या मर्जीने चालते काम शुन्य होते. विकास कामे का झाली नाही हे स्पष्ट करावे एका सिडको भागातील नगरसेवकांना विश्वासात घेतले नाही असेल तर खुलासा दयावा. काम कोणते केले कोणते रस्त्याची कामे घेतलेले आहे कोणत्या भागातील ड्रेनेज लाईनचे काम केलेले आहे कोणती १० लक्षची कामे केलेली आहे व करणारआहे विचारणा करण्याचे काम प्रशासनाचे नाही का ? स्थायी समितीच्या बैठकीत सिडकोकडे १५ कोटी मिळतील त्यातून सिडको भागात विकास कामे करण्याचे ठरविले होते. तरी कोणत्याही सिडकोच्या सदस्याशी संपर्क करून विकास कामाबाबत माहिती दिली नाही त्या त्या वार्डातील सदस्यांना विचारल्याशिवाय कामे करतात कसे. १०-१० लक्षची जी कामे प्रशासनाच्या वतीने सुचविले स्थायी समितीच्या बजेटमध्ये १०-१० लक्षची कामे अमुक तरतूद मधून करण्याचे प्रशासनाने का ठेवलेले नव्हते. काही भागात रस्त्यावर,नाल्यावर, ड्रेनेजवर कामाची तरतूद ठेवलेली आहे. त्यातून खर्च करता येत होते.परंतू अद्याप काहीच कार्यवाही केली नाही व कुणी अधिकारी/कर्मचारी स.सदस्यांपर्यन्त विकास कामाच्या संदर्भात विचारणा करण्यासाठी आलेले नाही.

मा.उप महापौर (पीठासीन अधिकारी) : या संदर्भात मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त : ३ तारखेला कळले की १ तारखेपासून सिडको हस्तांतर करून घ्यायचे त्यामुळे २० दिवसाच्या आत २८४ कामाच्या बाबत टेंडर काढले मंजूरी दिली.साफसफाईचे टेंडर काढले. ड्रेनेजचे कामाचे टेंडर काढले. १०० टक्के स्ट्रीट लाईटचे टेंडर

काढले. १ तारखेला कोणत्याही कामाचे खर्चाचे हेड पडले नाही. काही कर्मचारी यांनी २१-२२ तास काम केलेले आहे १ तारखेला कोणताही खर्च पडलेला नाही. १ तारखेच्या नंतरची सर्व कामे सुरू झाली. १०-१० लक्षची कामे १५ कोटीमधून होणार हे ५ ही पदाधिकारी यांना कळविले होते. १७-१८ नगरसेवक आहे त्यांचेकडून १०-१० लक्षची कामे घेवू व १५ कोटीपैकी १.७० कोटी खर्च करू असे म्हटले होते.तसेच माझे स्वीय सहाय्यक यांना सुध्दा सांगितले होते की,सिडकोच्या नगरसेवकांकडून यादी घ्यावी. ५-६ कामाची यादी येत होती त्यापैकी एक एक कामाची नोंद करून घेतली. २० दिवसात संपूर्ण सिडको भागातील नगरसेवकांच्या प्रत्येक वार्डात १०-१० लक्षची कामे मंजूर झाली ही कामे १५ कोटीतून होणार आहे. पदाधिकारी यांना कळविले होते.परंतू नगरसेवकांना कळविले नाही. स्थायी समितीला यादी देताना ती वेगळया कामाची यादी दिली काम करायचे असेल तर बजेटमध्ये तरतूद असावयास पाहिजे. स्थायी समिती मान्य करते त्यानंतर सर्वसाधारण सभेची मान्यता होते.

श्री काशिनाथ कोकाटे : जेव्हा स्थायी समितीला प्रशासनाने बजेट सादर केले त्या बजेटमध्ये सिडको भागातील १७-१८ वार्डातील १०-१० लक्षचे कामाचा समावेश केलेलाआहे का?

मा.आयुक्त : स्थायी समितीकडे सिडको विकासासाठी १५ कोटीचे हेड असे दिले होते.परंतू पदाधिका-यासमवेत चर्चा झाली की स्थायी समितीमार्फत १०-१० लक्षची अशी १.७० किंवा १.८० कोटीची कामे करू ४.५० कोटीचे कामे मोठी करू आणि उर्वरीत रक्कमेत जे काही नियोजन करायचे होते ते करू शकतो असे ठरले होते म्हणून प्रशासनाने नांवानिशी न देता सिडकोतील विविध विकास कामे म्हणून १५ कोटीची तरतूद ठेवली होती. २४ तारखेला सर्व अंदाजपत्रक तयार होते. आज ही आहे १२-१३ कामाचे टेंडर आहे बाकीचे कामे बजेटमध्ये आले तरच करू शकतो.

मा.उप महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेवून सिडको भागात जे विविध विकास कामे करायची आहे अंदाजपत्रक तयार झाले आहे. आता बजेट बुक तयार झालेले आहे, त्यानुसार ताबडतोब कामे सुरू करावी.तसेच शहरातील नाल्याची सुध्दा ताबडतोब साफसफाई करण्यात यावी. आता विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. २४२/१ :**

दिनांक १८.०२.२००६,दि.१०.०३.२००६,३१.०३.२००६ व दि.१३.०४.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण/विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री सलिम खॉंन : दि.१८.२.२००६ च्या सर्वसाधारण सभेत पान क्र.१४ वर जो पुतळा उभारण्याबाबत ठराव झाला तो माझ्या वार्डात येतो त्यास माझा विरोध आहे. ज्यांनी प्रस्ताव ठेवला त्यांचे वार्डात तो पुतळा उभारावा. माझ्या वार्डात पुतळा उभारू नये.

(याच वेळी स.सदस्य श्री सलिम खॉंन मा.महापौर डायससमोर जावून मोठमोठयाने बोलतात काही ऐकू येत नाही.)

श्री दत्ताभाऊ पाथ्रीकर : आपण सत्ताधारी पक्षाचे असून आपल्या सदस्यांना वारंवार बोलण्याची संधी देता इतर सदस्यांना ही बोलण्याची संधी दयावी. नांव घेतल्याशिवाय कुठल्याही सदस्यांना बोलण्यास उभे राहू नये अशा सूचना कराव्यात.

मा.उप महापौर (पीठासीन अधिकारी) : सर्वांनी आप आपल्या जागेवर बसावे. एका वेळी एकाच स.सदस्यांनी बोलावे. इतिवृत्तात दुरूस्ती काय असेल तर बोलावे.

श्री. सलिम खॉंन : स.सदस्य श्री.विनायक पांडे यांचा वार्ड ६ येतो. त्यांनी त्यांचे वार्डात संभाजी महाराज यांचा पुतळा बसण्यावर माझी हरकत नाही परंतू माझ्या वॉर्डात पुतळा उभारू नये माझ्या वॉर्डात कुणाला प्रस्ताव ठेवण्याचा अधिकार नाही.

| | |
|---|---|
| मा.उप महापौर (पीठासीन अधिकारी) | : स.सदस्य श्री. सलिम खॉन यांनी आपल्या जागेवर बसावे. सूचना देण्यात येते सभागृहात गैरवर्तन कुणी करू नये. (याच वेळी स.सदस्य श्री सलिम खॉंन हे सभागृहात निषेध करीत व विषय पत्रिका फाडून फेकतात व सभागृहाबाहेर निघून जातात.) |
| श्री दत्ताभाऊ पाथ्रीकर | : विषय पत्रिकेवर मागील बैठकीत चर्चा होवून जे निर्णय घेतले त्या संदर्भात प्रशासनाने काय कार्यवाही केली हे येणे आवश्यक आहे. मी अनेक वेळा याबाबतीत बोललो परंतू कार्यवाही होत नाही. |
| श्री कचरू मोरे | : जनतेने आम्हांला जनतेच्या हितासाठी निवडून दिले चांगल्या प्रकारे चर्चा होते व पुन्हा खंडीत होते.नाल्याच्या संदर्भात ३८ लक्षच्या सफाईच्या निविदा काढल्या. त्या कोणत्या नाल्याच्या आहेत याचा खुलासा दयावा. कारण जेथे झोपडपट्टी चा भाग आहे तेथील नाले यात नसावे.तसेच वार्डात सफाईचे काम होत नाही. |
| मा.उप महापौर (पीठासीन अधिकारी) | : स.सदस्य श्री मोरे यांनी संबंधीत अधिकारी यांना पत्र दयावे ते लेखी खुलासा आपणास या संदर्भात करतील. |
| श्री. संजय जोशी | : इतिवृत्त दि.१८.२.२००६ रोजीच पान क्र.१८ वर मालमत्ता कर वाढवले कमी केले.या संदर्भातील आहे.यात प्रस्तावातील अनु.क्र.७ मध्ये २० टक्के ऐवजी ५० टक्के सुट राहील. प्रस्तावातील क्र.७ वर आहे त्यासाठी नेहमी मी बोलत असतो. मागील इतिवृत्त तात्काळ दिले पाहिजे. हा विषय शहराच्या जिव्हाळयाचाप्रश्न आहे. पान क्र १८ वर प्रस्तावातील अ.क्र.७ मध्ये ६ वी ओळ मध्ये २०% ऐवजी ५०% सुट राहील.पान क्र.२० मध्ये टेबल खाली ७ कॉलममध्ये औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील बांधकाम व्यावसायीक ग्रुप हौसिंग स्कीमला चालना देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येते की, सामान्य करात ग्रुप हौसिंगला २० टक्के सुट देण्यात यावी ही ५० टक्के धरण्यात येते.कारण ग्रुप हौसिंगमध्ये आलीत. जवळपास पूर्णपणे विकास कामे करायचे असते. तसेच रस्ते,खुली जागा पण विकसीत करायची असते. जवळपास ही घरे बांधून जातो त्यांना २० +५०+सुट देणार त्यानंतर ग्रुप हौसिंग सोसायटीचा टॅक्स जमा करण्याची जबाबदारी कुणाची राहील. ५० टक्के सुट देणारआहात परंतू त्यानंतर त्या भागात अंतर्गत देखभाल काम कोण करणार आहे. एक स्कीम माझ्या वार्डात झाली तो बिल्डर बांधकाम करेल कदाचित तो महानगरपालिकेकडे हस्तांतर ही करणार नाही. त्या स्कीममध्ये आप आपसात तेथील लोकांचे भांडण होऊ शकते.आज सुध्दा फ्लॅट स्कीममध्ये लोक पैसे देण्यास वाद होतो.तो वाद मिटवण्यासाठी नगरसेवकांना जावे लागते. ५० टक्के सुट देऊ तेथील १० लोक रहात असतील तर नाईलाजाने तेथील मेन्टनंस काम करावे लागते त्यास जवाबदार कोण राहील. पान नं.२२ वर जो ठराव झाला त्यात पण असे दिले की,औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील बांधकाम व्यावसायीक ग्रुप हौसिंगला प्रोत्साहन देण्यासाठी सामान्य करात २० टक्के सुट देण्यात येते. अंतरीम विकास विकासक जो पर्यन्त स्वत: करेल तो पर्यन्त ही सुट योग्य राहील. २० % नसून ५०% आहे. यापूर्वी लिहिण्यात आले आहे.एकादया बिल्डर्सने १०० फ्लॅट बांधकाम केले जो पर्यन्त त्यांचेकडे फ्लॅट राहील तो पर्यन्त ५०% सुट व विक्री केल्यानंतर सामान्य नागरीकांना सुट राहणार नाही असा त्याचा अर्थ होतो याचा सविस्तर खुलासा करावा. |
| मा.आयुक्त | : यासंबंधी प्रशासनाचे मत काय आहे मला सांगण्याची संधी मिळाली जे काही ले आऊट डेव्हलप होतात. ते पूर्वी दोनप्रकारचे व्हायचे एक आपण संपूर्ण डेव्हलपमेंट चार्जेस घेऊन सर्व रस्ते वगैरे सुविधा देतो दुसरे सेल्फ डेव्हलपमेंट करणे यात संबंधीतानी बेटरमेंट चार्जेस भरणा करायचे नाही. सर्व डेव्हलप केल्यानंतर महानगरपालिकेस हँडवर्क करायचे ही पध्दत पूर्ण राज्यात होती. त्यानंतर असे |

झाले की त्या ले आऊटमधील रस्ते वगैरे त्या लोकांनीच डेव्हलप करायचे जे लोक तेथे राहतात त्यांनी ग्रुप हौसिंग करावी असोसिएशन रजिस्ट्रेशन करावी.त्या सोसायटीने संपूर्ण मेन्टनस करावे व नेहमीसाठी असोसिएशन ठेवावी.

श्री संजय जोशी : जर माझा १० बंगल्याचा ले आऊट असेल तो मी डेव्हलप केला त्यानंतर तेथील १० लोकांना मेन्टनंस करण्यासाठी परवडणारे आहे का ? प्रॅक्टीकली सांगावे.

मा.आयुक्त : महानगरपालिकेने एक ठराविक क्षेत्र असेल तर ग्रुप हौसिंग होते ले आऊट मंजूर होते. ग्रुपमध्ये १००-२००-३०० घरे असू शकतात ते एक ग्रुप म्हणून राहू शकतील.

श्री संजय जोशी : १० लोकाचे घरे असतील तर त्यांना हे परवडणारे आहे का ?

मा.आयुक्त : कोणत्याही कारणामुळे त्यांना परवडले नाही.मेन्टनन्स थांबवले.सामान्य करात कोणत्याही प्रकारची सुट राहणार नाही.

(याचवेळी मा.महापौर आसन ग्रहन करतात)

श्री संजय जोशी : १० लोकांना परवडणारे नाही जो पर्यन्त बिल्डर तेथे आहे तो पर्यन्त काम करून देईल.परत ५० टक्के चा कर ही १०० टक्के घेणार नाही मी १०० टक्के भरतो म्हणून माझ्यावर अन्याय होईल असे चित्र दिसून येईल यात जे वाक्य विकासकाला सुट देण्यात येते ते वगळावे.

मा.आयुक्त: यात असे म्हटले की, त्यांना सामान्य करात ५०% सुट राहीलजर तो बिल्डर तेथील १००% मेन्टनस कामावर खर्च करत असेल तर महानगरपालिकेचे कोणीही कर्मचारी तेथे जाणार नाही. कोणतेही शहर घ्या पुणे,नाशिक,ठाणे,मुंबई येथे ग्रुप हौसिंगमध्ये ९०% घरे होतात. ले आऊटमध्ये १०% होतात. परंतू या शहरात ९०% ले आऊट प्रकरण होते १०% ग्रुप हौसिंग होते. ग्रुप हौसिंगमध्ये ५-६ एकर क्षेत्र घ्यायचे एक पूर्ण बंगला म्हणून उभारणी करायची ग्रुप हौसिंगमध्ये एफएसआय लहान असते कोणती जागा ताब्यात घेत नाही रस्ता,स्ट्रीट लाईट,ड्रेनेज,सफाईचे काम ताब्यात घेत नाही. यात एकच व्यक्ती म्हणून ट्रीट करायचे आहे. विद्यूत बिल एकच सोसायटीच्या नांवावर जाणार,कचरा बाहेरचा उचलू शकतो. आतील साफ सफाई करीत नाही. स्ट्रीट लाईटचे काम करतो ताब्यात घेणार नाही म्हणून अशा प्रकरणात ६६% अॅक्टप्रमाणे सूट आहे. परंतू ५०% ठेवली आहे. ग्रुप हौसिंगमध्ये सामान्य कर प्रत्येक वर्षी भरायचा असतो. कोणत्या ग्रुप हौसिंग सोसायटीने कर भरणा केला नाही व तेथे आता मेन्टनंस काम करावे असे प्रेशर कमीत कमी कुणी सदस्यांनी प्रशासनावर कृपया आणू नये. जर ज्या ग्रुप हौसिंगमध्येमेन्टनंस का करावे लागले तर त्या ग्रुप हौसिंगला कोणती करात सवलत देय असणार नाही व ते ग्रुप हौसिंग म्हणून राहणार नाही.

श्री डॉ.भागवत कराड : बिल्डर बांधकाम करेल त्यानंतर तेथील फ्लॅट विकेल जी सुट देय आहे ती बिल्डरला न देता तेथील रहिवाशी यांना का देत नाही त्यांना सुट दिली तर ते कोणतेही मेन्टनंस काम महानगरपालिकेकडून करून घेणार नाही.

मा.आयुक्त : यात बिल्डरांना कशाची सुट नाही जे लोक घर विकत घेतील त्यांना सोसायटी करावी लागेल ते लोक मेन्टनंस करतील.

श्री. संजय जोशी : यात विकासकास सुट देण्यात येते असे दिसते ती दुरूस्ती करावे सुट देण्यात येवू नये. बिल्डर दोन वर्षानी फ्लॅट विकेल संपूर्ण शहराला याचा त्रास होईल. प्रस्ताव व ठराव हे दोन प्रकार असतात. ५०% सुट दयावी म्हणून प्रस्ताव आलेला आहे मी ठरावाबद्दल बोलतो.

मा.आयुक्त : ग्रुप हौसिंगमध्ये जितके वर्ष मेन्टनंस करतील तितके वर्ष सवलत राहील.

श्री. संजय जोशी : ही परिस्थिती या शहरासाठी फि जीकल होणारनाही.माझ्या वार्डात जवळपास १०० अपार्टमेंट आहे तेथे मेन्टनंस करण्यासाठी लोकात आपआपसात वाद होतो.

त्या अपार्टमेंटमधील सफाईचे साहित्य चोरीला जाते अशी परिस्थिती आहे. भविष्यात प्रशासन मेन्टनंस करणार नाही. सर्व लोक नगरसेवकांकडे येतील आम्हांला त्रास होईल. याबाबत योग्य निर्णय घ्यावा गंभीर विषयक आहे.

मा.आयुक्त : पूर्ण जबाबदारी सोसायटीची राहील मेन्टनंस बंद केले तर सुट मिळण्यास बंद होईल. महानगरपालिकेचे कर्मचारी टॅक्स वसूल करतात त्यात गडबड होते खर्च बघतो तो जास्त होतो त्याऐवजी ५०% कर घेतो ५०% कर ज्याच्या त्याच्या सोईनुसार दयावा आणि मेन्टनंस करून घ्यावे.

श्री. संजय जोशी : उदा. मी एक ग्रुप हौसिंग केले ५० लोक राहतात त्यांना मान्य झाले तर या पध्दतीने करावे.विकासकास सुट देणे बळजबरी करू नये.

मा.आयुक्त : ग्रुप हौसिंगमध्ये केंद्र शासनाने इन्कम टॅक्समध्ये सुट दिली याचा अर्थ एक ग्रुपमध्ये एखादा भाग मेन्टनंस होत असेल तर शासनाचे पैसे वाचतात. म्हणून इन्कम टॅक्समध्ये सुट दिली आहे. या महानगरपालिकेच्या हद्दीत बिल्डरांनी ग्रुप हौसिंगच्या नांवाखाली इन्कम टॅक्सचा फायदा घेतला.

श्री. संजय शिरसाट : जवाहरकॉलनी रस्त्यावर सेल्फ डेव्हलपमेंट खिंवसरा यांनी केले आहे. २० वर्षापूर्वी बांधकाम झाले आजही भोगवटा प्रमाणपत्र महानगरपालिकेचे घेतलेले नाही. रस्ता तेथे अरूंद झालेलाआहे तेथे महानगरपालिका सुविधा देवू शकत नाही. संबंधीतानी महानगरपालिकेचे भोगवटा प्रमाणपत्रच घेतले नाही अशा वेळी महानगरपालिका प्रशासन काय करणार आहे.

मा.आयुक्त : सेल्फ डेव्हलपममेंट ही ग्रुप हौसिंग स्कीम नव्हे.

श्री. संजय जोशी : बांधकाम करून २० वर्ष झाले भोगवटा प्रमाणपत्र घेतले नाही.

मा.आयुक्त : जो पर्यन्त बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र घेत नाही तो पर्यन्त सुट देता येत नाही. बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र जो पर्यन्त घेत नाही ती १००% कर भरावा.जे बिल्डर डेव्हलप करीत होते ग्रुप हौसिंगच्या नांवावर मंजूरी घेत असत. इन्कम टॅक्सचा फायदा घेतल्यानंतर सेल्फ डेव्हलपमेंट करीत होते रस्ते ताब्यात देत होते यास खंडन करावयाचे आहे.ग्रुप हौसिंगमध्ये करायचे असते व इन्कमटॅक्स फायदा घ्यायचा असेल तर१००% डेव्हलप करावे नसता त्यांनी सेल्फ डेव्हलपमेंट करावे.

श्री.संजय जोशी : महानगरपालिकेची टॅक्स पावती किंवा बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र असल्याशिवाय इन्कम टॅक्समध्ये सवलत मिळत नाही.

मा.आयुक्त : ग्रुप हौसिंगमध्ये आतापर्यन्त येथे रस्ते वगैरे ताब्यात घेतले जात होते ते सर्व बंद करणार आहे. कोणीही जागा ताब्यात घेणार नाही त्यासाठी परवानगी देणारच नाही जे काही पुढील १० वर्षात होईल त्यास अलीकडे आणायचे आहे म्हणून सुट देण्यासाठी दिले आहे. १० वर्षात ले आऊट दिसणारच नाही पूर्ण ग्रुप हौसिंग करतील.

श्री.संजय जोशी : विकासकास सुट नदेता भोगवटा धारकांना दयावी.

सौ.लता दलाल :बिल्डर डेव्हलप करून जाईल त्यानंतर तेथे विकास होणार नाही तेथील मतदार आम्हांला हाकलून देतील त्याचे उत्तर आम्हांला दयावे लागणार आहे.

मा.उप महापौर : भोगवटा धारकांस सुट मिळावी या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे.

मा.आयुक्त : यात एकच शब्द जो विकासक ऐवजी घरमालक जे राहतील ते टाकण्यात यावे जे मिनीटस्मध्ये करयोग्य मुल्य दाखवले ते फारच कमी आहे असे प्रशासनाचे मत आहे विनंती आहे की, कमी करू नये. जे कमी केले त्यामुळे अंदाजे ४-५ कोटीचे नुकसान होईल. स्थायी समितीने जे मान्य केले ते आलेले आहे यात प्रशासनाचे मत नाही. यावर पुन्हा योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.संजय जोशी : संबंधीत लोक मेन्टनंस करण्यास तयार असेल तर ती सुट देवू हा पहिला मुद्या. समजा माझ्या वार्डात ग्रुप हौसिंग सोसायटी झाली ५० लोक राहतात. अशा

पध्दतीने करण्यात ते लोक तयार नसतील जबरदस्तीने करू नये बिल्डरच्या फायदयासाठी.

मा.आयुक्त : ग्रुप हौसिंग झाले सुट दिली किंवा नाही याला अर्थ नाही.परंतू महानगरपालिका ताब्यात घेणार नाही.

श्री.संजय जोशी : आता पर्यन्त सेल्प डेव्हलपमेंट होत होते ग्रुप हौसिंग होवून व महानगरपालिका ताब्यात घेत होते.

मा.आयुक्त : ग्रुप हौसिंग होवून चुकीने ताब्यात घेतले जात होते. आता पर्यन्त जी चुक झाली ती थांबवायची आहे.

श्री.संजय जोशी : यात प्रशासनाची चुक आहे.

मा.आयुक्त : अधिका-यांना ग्रुप हौसिंगची कल्पना नव्हती. ग्रुप हौसिंग काही ताब्यात घेतलेले आहे तेथील रस्ते ताब्यात घेतलेले आहे. रस्ते ताब्यात घेणे म्हणजे ग्रुप हौसिंग होत नाही. जे बिल्डरने फायदा घेतला तो परत घ्यायला पाहिजे. प्रश्न असा जे चुकीने घेतले आहे त्याबाबतीत काम करणार आहात. ज्या बिल्डर ग्रुप हौसिंग केले. इन्कम टॅक्स ऑफीसची फसवणूक केली तसे कळवू शकतो जे महानगरपालिकेने ताब्यात घेतले असेल तर मालमत्ता करात कोणत्याही प्रकारची सुट देता येणार नाही तर त्यांनी म्हटले आम्ही मेन्टनंस करतो. ४०% माफ करावे ते ताब्यात दिले जाईल. ५०% माफ केले जाईल जे ताब्यात घेतले आहे तेथे मेन्टनंस करावे लागेल चुक झाली. येत्या १० वर्षात सर्व लोक ग्रुप हौसिंगकडे वळतील.

श्री.संजय जोशी : रेडीरेकनर जे अ,ब,क,ड असे भाग करून घ्यायचे दिले आता जे रेडीरेकनर आहे त्या संदर्भात काय ?

मा.आयुक्त : आज पर्यन्त जे रेडीरेकनर रेट प्रमाणे घेतले आहे ते तसेच राहणारआहे. रेडीरेकनर रेट वाढले तर आता जे रेट आहे त्यात वाढ होणार नाही. जो पर्यन्त सभागृह निर्णय घेणार नाही तो पर्यन्त रेट वाढणार नाही.

श्री.संजय जोशी : दरवर्षी रेट वाढत असतो.

मा.महापौर : दरवर्षी रेट वाढत असतील कमी होत असतील ते रेट आपल्याकडे लागू होणार नाही. आता जे रेट अ,ब,क,ड प्रमाणे केले आहे तेच राहणार आहे.

श्री.संजय जोशी : ४ वर्षासाठी हे रेट राहणार आहे असे दिले.

मा.महापौर : प्रशासन एक,दोन,तीन वर्षानंतर रेट बाबतीत ठेवले. आज जे रेटीरेकनरचे रेट आहे ते चारवर्षासाठीच राहतील. सन २००७-०८ ला रेडीरेकनर रेट वाढले तर महानगरपालिकेचे वाढणार नाही.

मा.आयुक्त : प्रत्येक वर्षी मालमत्ता कर वाढविण्याबाबतीत प्रशासन फेब्रुवारीमध्ये सभागृहासोर ठराव देत असते. यात ५ प्रकारची वर्गवारी केलेली आहे हे दर फक्त नवीन बांधकामास लागू होतील जे जुने आहे त्याची रिव्हेन्यु व्हॅल्यू फीस झाली.

श्री.संजय जोशी : कराचे दर वाढण्याचा प्रस्ताव येतो,त्यात जुन्या मालमत्ताचे कर वाढणार नाही का? त्यावेळी त्या रेडीरेटप्रमाणे वाढणार प्रशासनाच्या मताने वाढविणार ४ वर्षासाठी ठेवले ४ वर्षानंतर ५०००/- रू.भाव ७०००/-होता ९०००/- रू. भावाने कर वाढविण्याचा प्रस्ताव आला तर कशा प्रकारे वाढ करणार आहे.

मा.आयुक्त : ज्या वेळेस मालमत्ता कराचा प्रस्ताव देतो तो रेट वाढविण्यासाठीचा असतो हे कर योग्य मुल्यासाठी आहे की कोणत्या भाडयाचे दराने रेट लावायचा जर कर योग्य मुल्य डिसाईड झाली. त्या घरामध्ये जो पर्यन्त बदल होत नाही वाढीव काम होत नाही तो पर्यन्त कर योग्य मुल्य नाही. आतापर्यन्त ज्या काही जुन्या इमारती आहे त्याचे कर योग्य मुल्य तेच राहणार आहे. काही फरक पडणार नाही जो रेट ऑफ टॅक्सेसनआहे तो कमी केलेला आहे ती आपल्या संमतीने केलेला आहे जो कर योग्य मुल्य आहे ज्यांचेवर टॅक्स वाढणार आहे तो जुन्या बिल्डींगसाठी

बदलणार नाही. समजा आज एक नवीन इमारत झाली ती कोणत्या क्षेत्रात झाली त्याचा कर योग्य मुल्य काय आहे त्याप्रमाणे कर योग्य मुल्य काढले जाईल जर पुढील वर्षी ती इमारत तशीच ठेवली. कर योग्य मुल्य बदलणार नाही वाढीव बांधकाम केले तर वाढीव बांधकामाच्या हद्दीपर्यन्त कर योग्य वाढेल. कर योग्य मुल्य आकारणी करण्यासाठी एक तक्ता दिला होता तर आपण फारच कमी केलेले दिसते कमी करणे या शहरासाठी योग्य नाही.

श्री.संजय जोशी : महाराष्ट्र शासनाने पाठवलेला आहे हा निर्णय तात्पुरता अधिवेशनात मंजूर झाले.

मा.आयुक्त : जो मंजूर झाला नाही तो विषय असा की, कर योग्य मुल्याचा कन्सेप्ट काढून टाकावा. नवीन बांधकामाच्या व्हॅल्यूशन नुसार करावे ते आता पर्यन्त मंजूर झाले नाही आणि कॅपिटल व्हॅल्युवर जाईल. कर योग्य मुल्य फारच कमी केले एवढे कमी करू नये अशी विनंती आहे.

श्री अ.रशिद खॉंन : दुरूस्ती करण्यात यावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : स्वातंत्र्य सैनिक व सैनिक ,माजी सैनिकांना विशेष बाब म्हणून एका मालमत्तासाठी करात सुट देण्याचा सर्वसाधारण सभेने निर्णय घेतला आहे त्यांना भारत सरकार व महाराष्ट्र शासनास भरावयाचे कर व्यतिरीक्त बाकी सर्व करात सुट देण्यात यावी.

मा.महापौर : सामान्य करात १००% सुट दिलेली आहे.

सौ.लता दलाल : ४ सभांचे इतिवृत्त एकदम दिले तर त्यावर काय चर्चा करणार. आताच मागील फार जुना विषयावर चर्चा झाली. प्रत्येक बैठकीत मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्यासाठी यापुढे देण्यात यावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : मागील बैठकीत जी चर्चा होते त्यावर काय ॲक्शन घेतली जाते कार्यवाही होते की नाही.

मा.महापौर : सभा संपन्न झाल्यानंतर ॲक्शन पॉईंट सचिवमार्फत मा.आयुक्ताकडे दिले जाते. मा.आयुक्त यांना सूचना करतो की, मागील प्रत्येक बैठकीत ॲक्शन पॉंईट नुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सभागृहात ठेवावा. मिनीटस्‌मध्ये जरी नाही आले तर आपण काय सूचना मागच्या बैठकीत मांडली होती. त्या संदर्भात बैठकीच्या सुरूवातीस माहिती द्यावी.

मा.आयुक्त : आज बैठक झाली त्यानंतर इतिवृत्त कायम होते इतिवृत्त कायम केल्यानंतर काय कार्यवाही केली हे पुढील बैठकीत प्रशासन खुलासा देवू शकेल.

श्री.संजय शिरसाट : विरोधी पक्ष नेता यांनी चांगला मुद्या उपस्थित केला. मागील बैठकीस जो निर्णय घेतला जातो त्याची अंमलबजावणी संदर्भात विषय पत्रिकेवर येत नाही. मागील बैठकीस सहाय्यक संचालक नगर रचना श्री.राठोड यांचेवर गुन्हा नोंद करण्याचे आदेशित केले होते काय कार्यवाही झालेली आहे. मा.आयुक्त यांना इतिवृत्ताची प्रत सुध्दा देण्यात आली होती. हा सुध्दा ॲक्शन पॉईटचा एक भाग आहे. इतिवृत्त कायम होण्यापूर्वी यासंबंधी सभागृहाला माहिती देणे आवश्यक आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : सहाय्यक संचालक नगर रचना यांचे बाबतीत जो काही निर्णय घेतला होता. त्याबाबत काय कार्यवाही केली मा.आयुक्तानी खुलासा करावा. तसेच उप आयुक्त यांचे पदाच्या संदर्भात रोज वृत्तपत्रात बातम्या येत आहे. शासनास प्रस्ताव पाठवला विखंडीत केला सत्य परिस्थिती सभागृहासमोर मांडावी.

मा.महापौर : विषय वेगळा विचारत आहे. इतिवृत्तांतावर बोलावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : इतिवृत्तात विषय आहे. स.सदस्यांनी चांगल्या भावनेतून विषय घ्यावयास लावला यात वृत्तपत्राच्या माध्यमातून स.सदस्यांची महापौराची बदनामी होत आहे.अधिकारी स्वत: वृत्तपत्रात बातम्या देत आहे.

श्री.संजय शिरसाट : यापूर्वी आयुक्त सुट्‌टीवर असतांना प्र.आयुक्त म्हणून श्री भगत साहेब यांचेकडे चार्ज होता. एक बातमी वृत्तपत्रात आली त्यांचे ताबडतोब लक्षात आले की, अधिका-यामार्फत्त जर महानगरपालिकेची बदनामी होत असेल तर योग्य नाही त्यांनी सौ.ज्ञानदा कुलकर्णी यांना २० दिवस निलंबित केले होते. आज वृत्तपत्रात बातमी आली की, उप आयुक्त म्हणतात मला मुदत वाढ नको. मा.आयुक्तानी निलंबनासंदर्भात कार्यवाही करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : वृत्तपत्रात जे आले त्याबाबत प्रशासनाचा खुलासा घ्यावा. तसेच उप आयुक्त पदाच्या संदर्भात शासनाकडून काय माहिती मिळालेली आहे.

श्री.डॉ.भागवत कराड : विषय क्र.२२७/१० प्रमाणे जायकवाडी पाणी पुरवठासाठी अभियंताची महानगरपालिका अस्थापनेवर पद निर्मिती करणे संदर्भात ही पदे करार पध्दतीने घ्यावीत.याऐवजी ही पदे महानगरपालिका आस्थापनेवर पदोन्नतीद्वारे भरण्यात यावी अशी दुरूस्ती करावी व आजची सभा तहकुब करावी.

श्री.संजय शिरसाट : विषय क्र.१ मंजूर करावा. इतर विषयावर २२ तारखेला सभा घेण्यात यावी.

श्री.डॉ.भागवत कराड : ज्या ज्या दुरूस्त्या सुचवल्या असतील त्या करून विषय क्र.१ मंजूर करण्यात यावा.

मा.महापौर : विषय क्र.१ दुरूस्तीसह मंजूर सभा तहकुब करण्यात येते.

**ठराव :**

इतिवृत्त दि.१८.०२.२००६ विषय क्र.१९६/१ च्या ठरावातील अ.क्र.७ मध्ये अंतरीक विकास जोपर्यंत विकासक स्वत: करेल, त्याऐवजी अंतरीक विकास जोपर्यंत भोगवटाधारक स्वत: करेल अशी दुरूस्ती करण्यास आणि अ.क्र.८ मध्ये स्वातंत्र्य सैनिकांसाठी आणि माजी सैनिकांसाठी विशेष बाब म्हणून त्यांच्या निवासी वापरातील त्यांच्या नांवावर असलेली एक मिळकतीवरील मालमत्ता करातील सामान्य करात १०० टक्के सुट त्यांना किंवा त्यांच्या पत्नी हयात असे पर्यंतच देणे,परंतू त्यांचे वारसांना सुट लागू राहणार नाही आणि इतिवृत्त दि.१३.०४.२००६ विषय क्र.२२७/१० मध्ये जायकवाडी पाणी पुरवठ्यासाठी महानगरपालिका अस्थापनेवर विविध अभियंत्यांची पदे निर्माण करून करार पध्दतीने भरणे ऐवजी सदर पदे महापालिकेच्या पात्र कर्मचाऱ्यामधून पदोन्नतीने भरण्यात यावी,अशी दुरूस्ती करण्यास व इतर दुरूस्त्यासह दि.१८.०२.२००६,१०.०३.२००६,३१.०३.२००६ व दि.१३.०४.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण/विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

यानंतर सभा तहकुब झाल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद